**L. A. BILL No. XX OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

## सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २०.

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २४ डिसेंबर, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्त्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून, त्यांनी दिनांक १ ऑक्टोबर २०२१ रोजी, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२१, हा प्रख्यापित केला होता ; १८८८ चा ३. १९४९ चा ५९. १९६५ चा महा. ४०. २०२१ चा महा. अध्या. ६.

**आणि ज्याअर्थी,** उक्त आदेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

## प्रारंभिक.

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १ ऑक्टोबर २०२१ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

प्रकरण दोन

## मुंबई महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा.

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५अ ची सुधारणा.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५अ च्या पोट-कलम (४) मधील, खंड (अ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :— १८८८ चा ३.

"(अ) नागरिकांच्या मागास वर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागा, महानगरपालिकेतील थेट निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या २७ टक्क्यांपर्यंत असतील आणि एकूण आरक्षण, महानगरपालिकेतील एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही ;".

प्रकरण तीन

## महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा.

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५अ ची सुधारणा.

**३.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५अ च्या पोट-कलम (१) मधील, खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :— १९४९ चा ५९.

"(क) नागरिकांच्या मागास वर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागा, महानगरपालिकेतील थेट निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या २७ टक्क्यांपर्यंत असतील आणि एकूण आरक्षण, महानगरपालिकेतील एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही आणि अशा जागा, महानगरपालिकेतील विविध प्रभागांना आळीपाळीने नेमून देण्यात येतील :

परंतु, अशा प्रकारे राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या एक-द्वितीयांश जागा, नागरिकांच्या मागास वर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील ;".

प्रकरण चार

## महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याची सुधारणा.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ९ ची सुधारणा.

**४.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम ९ च्या पोट-कलम (२) मधील, खंड (ड) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :— १९६५ चा महा. ४०.

"(ड) नागरिकांच्या मागास वर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागा, नगरपरिषदेतील थेट निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या २७ टक्क्यांपर्यंत असतील आणि एकूण आरक्षण, नगरपरिषदेतील एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु, अशा प्रकारे राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या एक-द्वितीयांश जागा, नागरिकांच्या मागास वर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील.”.

प्रकरण पाच

**संकीर्ण**

२०२१ चा महा. अध्या. ६.

सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ याचे निरसन व व्यावृती.

**५.** (१) मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२१, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

१८८८ चा ३. १९४९ चा ५९. १९६५ चा महा. ४०.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या संबद्ध अधिनियमांच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २०.]**

**[मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. एकनाथ शिंदे,**
नगरविकास मंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक २४ डिसेंबर, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.